महाराष्ट्र शासन
कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुर्नवसन
Tel.No. : (020)26124815
: (020)26127906
Email ID : igoffice.ddo-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,**
**कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,**
**जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,**
**पुणे ४११००१.**

**पहा:-** १. शासन निर्णय, वित्त विभाग क्रं.अग्रिम-२०२२/प्र.क्र.३२/२०२२/विनियम दि.१७.१०.२०२३.
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्रं.अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/विनियम दि.०९.११.२०२३.
३. शासन निर्णय गृह विभाग क्र.बीयुडी ०५२४/प्र.क्र.११३/आस्था-१ दि.१६.०९.२०२४.

जा.क्र.लेखा/मोटार वाहन अग्रिम/२०२४-२५/कक्ष-५, ९००६ पुणे ०१, दिनांक:- २४ .१०.२०२४

**// आदेश //**

**विषय:- वाहन अग्रिम मंजूर करणेबाबत**
**वित्तीय वर्ष २०२४-२५**

१. शासन निर्णय गृह विभाग क्र. बीयुडी ०५२४/प्र.क्र.११३/आस्था-१ दि.१६ सप्टेंबर २०२४ रोजीच्या पत्रानुसार सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी वाहन अग्रिम करिता **रुपये २२,०६,०००/- (अक्षरी रक्कम रुपये बावीस लक्ष सहा हजार फक्त)** इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच वाहन अग्रिमाकरिता **रुपये २२,०६,०००/- (अक्षरी रक्कम रुपये बावीस लक्ष सहा हजार फक्त)** इतके अनुदान खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

२. मुंबई वित्तीय नियमावली १९५९, नियम १३६ च्या उपनियम (१)(३)(अ)(४)(६)(७) व नियम १३७ आणि वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ नुसार शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-१०८९/५६/विनियम दि.०६.११.१९९० नुसार विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पुणे १ हे खालील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्रमांक ०४ मध्ये नमूद केलेली आगावू रक्कम वाहन खरेदी करण्यासाठी या आदेशातील भाग १ मधील अटींचे व शर्तीचे अधीन राहून एकूण रक्कम **रु.१३,४१,८००/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा लक्ष एक्केचाळीस हजार आठशे फक्त)** मंजूर करीत आहे.

३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१४/प्र.क्र.४९/कोषा प्र-५ दि.२२.०८.२०१४ नुसार कर्जे व अग्रिमे सेवार्थ प्रणालीद्वारे कोषागार कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. त्याकरिता सोबत जोडलेल्या यादीतील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मंजूर केलेल्या वाहन अग्रिम रक्कमेनुसार शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार सेवार्थ प्रणालीमध्ये माहिती भरुन मुख्यालयास पाठविण्यात यावी, जेणे करुन संगणक प्रणालीतील आदेश तसेच देयके तयार करता येतील.

४. सदर माहिती उक्त शासन निर्णय दि.२२.०८.२०१४ अनुक्रमांक ०८ नुसार सेवार्थ प्रणालीमध्ये भरुन संगणक प्रणालीद्वारे वाहन अग्रिम मंजूर करण्यास सक्षम अधिकारी यांचा सेवार्थ आयडी ***IGPSVSF8301/(SHRUTI BHUSHAN KULKARNI)/ 2201000475*** वर मुख्यालयास सादर करण्यात यावी व भरलेल्या माहितीप्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांची नावे, हफ्त्याची रक्कम, व्याजाची रक्कम व हफ्त्यांची संख्या इ.तपशिलवार माहिती पत्राद्वारे देखील मुख्यालयास कळविण्यात यावी.

५. या आदेशातील रकाना क्रमांक ०५ मध्ये नमूद केल्यानुसार सेवानिवृत्ती नजदीक असलेल्या अधिकारी यांची मोटारकार अग्रिमाची व्याजासहित वसूली होईल अशा प्रकारे वसूलीचे हफ्ते निश्चित करण्यात यावे.

६. या आदेशातील रकाना क्रमांक ०५ मध्ये नमूद केल्यानुसार अग्रिमाची मुद्दल अग्रिमाच्या व्याजासहित वसूल करताना नवीन मोटार सायकल अग्रिमासाठी व्याजासह जास्तीत जास्त ६० (साठ) हफ्ते, नवीन स्कूटर साठी ४८ (अठ्ठेचाळीस) हफ्ते, नवीन मोपेड साठी ३६ (छत्तीस) हफ्ते यापेक्षा जास्त हफ्ते ठरविण्यात येवू नये.

७. खालील नमूद केलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमाचे देयक **"मकोनि ५७"** या विहित नमुन्यात संबंधीत आहरण संवितरण अधिकारी यांनी "संबंधीत कोषागार" कार्यालयाकडे सादर करावे.

८. आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांची वाहन अग्रिमाबाबतची माहिती सेवार्थ प्रणालीद्वारे भरावयाची असल्याने जे अधिकारी/कर्मचारी यांची बदली इतर कारागृहात झाली असेल त्यांची नस्ती बदली झालेल्या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावी.

९. आदेशासोबत सर्वसाधारण महत्वाच्या सुचना प्रपत्र अ जोडण्यात आले आहे. त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**१०. सदरचे अनुदान सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातच खर्च करण्यात यावे व संबंधीतांना रक्कम अदा केल्यानंतर कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक न चूकता मुख्यालयास सादर करण्यात यावा.**

**११. अधिकारी / कर्मचारी यांना वाहन अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांकासह संबंधीतांच्या सेवापुस्तकात न चुकता नोंद घेण्यात यावी. तसेच सेवापुस्तकात व्याजाच्या रक्कमेचीही नोंद घेण्यात यावी.**

**(मा.अ.पो.म.सं.(का.) यांचे मान्यतेने)**

**(सत्यवान म. हिंगमिरे)**
स्वीय सहाय्यक,
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

**प्रति,**

**लेखा व अधिदान अधिकारी,**
लेखा व अधिदान कार्यालय, बांद्रा मुंबई
**कोषागार अधिकारी,**
नाशिक /बीड

**प्रत:- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव**
अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह:- मुंबई/ नाशिकरोड
अधीक्षक, जिल्हा कारागृह:- बीड

**प्रत:-** १. मा.विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), नाशिक विभाग नाशिक,
२. मा.कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग मुंबई

## वाहन अग्रिम मंजूर अधिकारी/ कर्मचारी यांची यादी सन २०२४-२५

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम व कार्यालयाचे नाव | वाहनाचा प्रकार | मंजूर केलेली रक्कम | अग्रिमाचे मुद्दल वसुली हफ्ते व दरमहा वसुली रुपये व व्याजाची परिगणना |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१. | प्रशांत उत्तम घुगे<br>शिपाई<br>नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह | नवीन मोटारसायकल | १,३३,००० | मुद्दल वसूली रु.२७७०/- चे ४७ हफ्ते व रु.२८१०/- चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२४४३१/- १२ हफ्त्यात वसूल करावे. |
| ०२. | राहुल विनायक राठोड<br>शिपाई<br>बीड जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १,३६,००० | मुद्दल वसूली रु.२८३०/- चे ४७ हफ्ते व रु.२९९०/- चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२४९६१/- १२ हफ्त्यात वसूल करावे. |
| ०३. | योगेश गजानन कुलकर्णी<br>प्रशासन अधिकारी<br>मुंबई मध्यवर्ती कारागृह | नवीन मोटारकार | १०,७२,८०० | मुद्दल वसूली रु.२२३५०/- चे ४८ हफ्ते व व्याज रक्कम रु.२,१९,०३०/- रु. ३१२९० चे ७ हफ्त्यात वसूल करावे. |
| | **(अक्षरी रक्कम रुपये तेरा लक्ष एक्केचाळीस हजार आठशे फक्त)** | | **१३,४१,८००** | |

**वाहन अग्रिम मंजूर केल्यानंतर संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा पुस्तकांमध्ये त्याबाबतची नोंद घेऊन पूर्तता अहवालासोबत सेवापुस्तकात घेण्यात आलेल्या नोंदणीची छायांकित प्रत मुख्यालयास न चुकता सादर करावी.**

Personal Assistant to
Inspector General of Prisons
Maharashtra State, Pune-1.

## प्रपत्र-अ

### -:सर्वसाधारण महत्वाच्या सूचना:-

१. या अग्रिमाकरिता होणारा खर्च ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे, २०२ वाहन अग्रिम मागणी क्रमांक बी-११ गौणशिर्ष २०२ (७६१०००९६), वित्त विभाग या अर्थसंकल्पात लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये खर्ची टाकण्यात येत आहे.

२. या आदेशातील अधिकारी/कर्मचा-यांच्या अग्रिमाची वसुली रकाना क्रमांक ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अग्रिम रक्कम ज्या महिन्यात वितरीत केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून देय होणाऱ्यावेतनापासून दरमहा करण्यात यावी. अग्रिम वसुलीत खंड पडल्यास दंडनीय व्याज दराने वसुली करावी. अग्रिम वसुलीचा तपशिल अग्रिम वसुली विवरणपत्रामध्ये प्रत्येक महिन्यात कळविण्यात यावा.

३. आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा सुरु असल्यास तसेच त्यांना शासकीय सेवेतून निलंबित अथवा कमी करण्यात आले असल्यास त्यांना मंजूर करण्यात आलेली रक्कम प्रदान न करता त्वरीत मुख्यालयाचे निर्दशनास आणावे.

४. ज्या अधिकारी/कर्मचारी यांना वाहन अग्रिम मंजूर झाले आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांची अग्रिमाची नोंद त्यांचे सेवापुस्तकामध्ये अग्रिम अदा केलेनंतर त्वरीत घेण्यात यावी.

५. या आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांनी मुंबई वित्तीय नियमावली १९५९ मधील विहित नमुना क्रमांक २० मध्ये करारनामा सादर करावा.

६. वाहन खरेदीचा व्यवहार पूर्ण होताच प्रतिभूती म्हणून क्रमांक २१ मध्ये गहाणबंधपत्र रक्कम काढल्यापासूनच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करावे. खरेदी केलेल्या वाहनाची मूळ किंमत, निर्मात्याचे नांव, वर्णन, सिलींडरची संख्या, इंजिन क्रमांक व चासी क्रमांक वगैरे तपशील विहीत नमुना क्र.२१ मधील विनिर्देशन अनुसूचीमध्ये उल्लेखिलेल्या प्रमाणे सविस्तर असावा. तसे न केल्यास अग्रिमाची संपूर्ण रक्कम १७ टक्के दंडनीय रक्कम शासनास परत करावी लागेल.

७. वाहन खरेदीचा संपूर्ण तपशील असणारे प्रमाणपत्र वाहनाची प्रत्यक्ष रक्कम अदा केल्याची मुद्रांकित रोख पावती इत्यादी माहिती अग्रिम प्रदान झालेनंतर एक महिन्याचे आंत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करावे. तसे न केल्यास अग्रिमाची संपूर्ण रक्कम दंडनीय दराने व्याजासह एकरकमी वसूल करुन तसे मुख्यालयांस व शासनास कळविण्यात यावे.

८. खरेदी केलेल्या वाहनाची अपेक्षित किंमत ही मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमापेक्षा कमी असेल तर उरलेली रक्कम शासनास त्वरीत परत करावी.

९. वाहन अग्रिम रक्कमेच्या नियमित वसुलीसाठी तसेच मंजूर अग्रिम रक्कमेपेक्षा जादा वसुली होत असल्यास त्यास अर्जदार स्वत:ही जबाबदार राहील.

१०. शासन निर्णय क्रमांक अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/विनियम दि.१७ ऑक्टोबर २०२३ नुसार मोटारकार खरेदी करण्यासाठी मंजूर केलेल्या अग्रिमा करिता संपूर्ण मंजूर अग्रिम रक्कमेवर व्याजाची परिगणना १०% या दराने करण्यात आली आहे.

११. शासन निर्णय क्रमांक अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/विनियम दि.०९ नोव्हेंबर २०२३ नुसार मोटारसायकल, स्कूटर, मोपेड खरेदी करण्यासाठी मंजूर केलेल्या अग्रिमा करिता संपूर्ण मंजूर अग्रिम रक्कमेवर व्याजाची परिगणना ९.% या दराने करण्यात आली आहे.

१२. ज्या वाहनासाठी अग्रिम मंजूर केले आहे ते वाहन खरेदी करण्यासाठी अग्रिम उपयोगात आणावे. तसे न केल्यास व अग्रिमाचा गैरवापर केल्यास मुंबई वित्तीय नियमावली १९५९ मधील नियम क्रमांक १२४ (ब) तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अग्रिम १०९०/व्याजदर/३६/विनियम दि.४.०१.१९९१ मधील विवरणपत्रक ड अनुक्रमांक ४ अनुसार लागू होणा-या १७ टक्के दंडनीय व्याज दराने संपूर्ण रक्कम एकरकमी वसूल करण्यात येईल.

**१३.** वाहनाच्या मॉडेलचे नाव, उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्या संदर्भाचे नोंदणीचे कागदपत्र सादर करावे लागेल.

**१४.** वाहन अग्रिम अधिकारी/कर्मचा-यास त्यांच्या सेवा कालावधीत एकदाच देय राहील.

**१५.** मुद्दल व व्याजाच्या रक्कमा निरनिराळ्या चलनाने भराव्यात. मूळ कर्ज किती व कोणत्या तारखेला घेतले व तसेच त्याबाबतचा प्रमाणक क्रमांक, दिनांक व कोषागाराचे नाव आणि कर्ज कोणत्या कारणासाठी दिलेले आहे त्याचाही तपशील चलनावर देण्यात यावा.

**१६.** अग्रिमाच्या मुद्दलाची वसूली प्रधानशिर्ष ७६१० शासकीय कर्मचा-यांना कर्जे, २०२ मोटार वाहन यांच्या खरेदीसाठी आगावू रक्कमा (७६१०००९६) या शिर्षाखाली व्याजाच्या रक्कम ००४९ (४५) (२) व्याजाच्या रक्कमा या शिर्षाखाली जमा करण्यात याव्यात.

**१७.** ज्या महिन्यामध्ये संपूर्ण मुद्दलाची परतफेड होईल त्या महिन्यानंतर लगेच येणा-या महिन्यापासून व्याजाची रक्कमेची वसुली तात्काळ सुरु करण्यात यावी. त्याप्रमाणे वसुली न केल्यास अथवा व्याजाच्या वसुलीत खंड पडल्यास शासनाने निर्धारित केलेल्या दंडनिय व्याज दराने व्याजाची आकारणी करण्यात येईल. **वसुल करावयाची रक्कम शिल्लक राहिल्यास ती रक्कम अधिकारी/कर्मचारी यांच्या मृत्यू नि सेवा उपदानातून एक रकमी वसुल करावी. तद्नंतरच ना देय प्रमाणपत्र द्यावे.**

**१८.** विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत खरेदी केलेल्या वाहनाचा विमा उतरविण्यात यावा व तो अग्रिमाचे संपूर्ण व्याजासह परत फेड होईपर्यंत सतत चालू राहिल याची दक्षता घेण्यात यावी.

**१९.** अधिकारी/ कर्मचारी यांची सध्याच्या कार्यालयातून बदली झाल्यास अग्रिमाच्या पुढील वसुलीकरिता त्याचा तपशील अंतिम वेतन प्रमाणपत्रावर स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. जेणेकरुन अग्रिमाची वसूली वेळेवर व अचूकरित्या होऊ शकेल. तसेच अग्रिमाच्या वसुलीची माहिती अग्रिम वसुली विवरणपत्रकात पाठविण्याविषयी नवीन कार्यालयास सूचित करण्यात यावे.

**२०.** अग्रिम घेणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे देय असलेल्या व्याजाच्या रक्कमेची ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालय प्रमुखाकडून तत्परतेने पडताळणी करुन घ्यावी. तसेच ज्या अधिकारी/कर्मचारी यांना अग्रिम मंजूर करण्यात आले आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांची आदेशात नमूद केलेप्रमाणे मुद्दलाची वसुली केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय असलेल्या व्याजाची वसुली लांबणीवर टाकण्यात येवू नये, वसुली त्वरीत सुरु करावी.

**२१.** **जे अधिकारी/कर्मचारी वाहन अग्रिमावरील मुद्दल व व्याज वसुलीच्या अगोदर सेवानिवृत्त होत असतील अशा अधिकारी/कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीनंतर देय होणा-या लाभांमधून वाहन अग्रिम प्रलंबित रक्कमांची वसुली करण्यात यावी.**

**२२.** वरील अधिकारी/कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालय प्रमुखांनी अग्रिमाची वसुली दरमहा नियमितपणे अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून करावी आणि त्याचा हिशोब ठेवावा. अग्रिम रक्कमेवरील व्याजाची वसुली निर्धारित दराप्रमाणे करणे आणि थकबाकीबाबत संबंधीतांना सूचना देणे, **अग्रिम अदा करणेसाठी व अग्रिम अदा केल्यानंतर आवश्यक ती कागदपत्रे विहीत कालावधीत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन दफ्तरी जतन करण्याची जबाबदारी कारागृह अधीक्षक/ कार्यालय प्रमुखांची राहिल याची कृपया नोंद घ्यावी. संबंधीत अर्जदारास अग्रिम मंजूरीच्या वेळी याबाबत आवश्यक सुचना देण्यात याव्यात. अन्यथा सदर प्रकरणी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अग्रीम १०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६ सप्टेंबर १९९७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.**

**(सत्यवान म. हिंगमिरे)**
स्वीय सहाय्यक,
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१